# दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अकोला

ॲप्रेन्टीस ॲक्ट १९६१ अंतर्गत सन २०२३-२०२४ करीता शिकाऊ उमेदवार(प्रशिक्षणार्थी) भरती

---

एकुण जागा ५०

अर्ज करण्याची शेवटची तारीख: ५.७.२०२३

---

१) अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अकोला चे अकोला व वाशिम जिल्ह्यातील शाखांवर ॲप्रेन्टीस ॲक्ट १९६१ अंतर्गत उमेदवारांची शिकाऊ उमेदवार म्हणून १ वर्ष कालावधी करीता भरती करावयाची आहे.

२) उमेदवार हा अकोला किंवा वाशिम जिल्ह्यातील रहिवासी असावा.

३) उमेदवार हा कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा तसेच संगणक प्रशिक्षीत ज्यामध्ये एमएससिआयटी किंवा तत्सम पात्रता धारण केलेला असावा.उमेदवाराने पुर्ण केलेल्या अभ्यासक्रमामध्ये संगणकासबंधी विषयाचा समावेश असल्यास सदरची अट शिथील करण्यात येईल.

४) ॲप्रेन्टीस करीता अर्ज करतांना उमेदवार पद्विधर किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण करून ६ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला नसावा. अभ्यासक्रम पुर्ण करून ६ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास असा उमेदवार पात्र ठरणार नाही.

५) अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी www.apprentiteshipindia.gov.in या पोर्टलवर स्वत:ची शिकाऊ उमेदवार म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे.सदर पोर्टलवर उमेदवारांनी नोंदणी न केल्यास अथवा उमेदवारांची नोंदणी न झाल्यास असे उमेदवार पात्र राहणार नाहीत.

६) अर्ज करणारे उमेदवाराने यापुर्वी सदर योजने अंतर्गत कोणत्याही संस्थेमार्फत प्रशिक्षण घेतलेले नसावे.

७) उमेदवाराचे वय दि.२०.६.२०२३ रोजी १८ पेक्षा कमी नसावे व ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.

८) अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत घेवून, निवड करण्यात येईल.

९) प्रशिक्षण काळात दरमहा रू.९०००/- विद्यावेतन देण्यात येईल. या मध्ये शिकाऊ शिक्षण प्रशिक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयाकडून मिळणारे विद्यावेतन रू.४५००/- राहील.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत बँकेच्या अकोला व वाशिम जिल्ह्यातील कोणत्याही शाखांवर प्रशिक्षणार्थी म्हणून देण्यात येईल.

११) प्रशिक्षण काळात उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

१२) उमेदवार एखाद्या महिन्यात १० दिवसा पेक्षा जास्त गैरहजर असल्यास त्या महिन्याचे विद्यावेतन दिले जाणार नाही.

१३) रूजु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रशिक्षण सोडल्यास कोणतेही विद्यावेतन दिले जाणार नाही.

१४) उमेदवाराचा प्रशिक्षण कालावधी कामावर रूजु झाल्याचे तारखेपासुन १२ महिन्याचा राहील १२ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण कालावधी आपोआप समाप्त होईल.

१५) प्रशिक्षण काळात उमेदवाराचे वर्तन चांगले नसल्यास उमदेवाराचा प्रशिक्षण कालावधी संपण्यापूर्वी कोणतेही कारण न देता केव्हाही कामावरून कमी करण्यात येईल.

१६) उमेदवारास बँकेला रू.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र करून देणे बंधनकारक राहील.

१७) प्रशिक्षण कालावधी संपले नंतर प्रशिक्षणार्थीस कालावधी वाढविणे बाबत किंवा नोकरीत कायम करून घेणेबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

१८) प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये कामगाराचा दर्जा उपभोगण्यास उमेदवार पात्र असणार नाही, म्हणून बँकेतील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोईसवलती (रजा) तसेच इतर सुविधास पात्र असणार नाही.

१९) प्रशिक्षण काळात अपघात झाल्यास किंवा इतर कोणतीही दुदैवी घटना घडल्यास शिकाऊ उमेदवारांना कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही अथवा त्याचा कुठलाही क्लेम लागु राहणार नाही.

२०) मुलाखतीनुसार पात्र उमेदवारांना शिकाऊ उमेदवार म्हणुनच निवड आदेश देण्यात येतील.अपात्र उमेदवारांना कळविण्यात येणार नाही.

EPP/40

२१) बँकेच्या वेबसाईटवर ॲप्रेन्टीस करीता अर्ज करणेसाठी उमेदवारांना लिंक उपलब्ध करून देण्यात आली असुन पात्र उमेदवारांनी दिनांक २०.६.२०२३ ते दिनांक ५.७.२०२३ या कालावधीत अर्ज करणे आवश्यक आहे.ईतर कोणत्याही मार्गाने अर्ज स्विकारले जाणार नाही.

२२) प्राप्त अर्जापैकी पात्र उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवुन प्रशिक्षणार्थी उमेदवारांची निवड करण्यात येईल.तसेच पात्र उमेदवारांना मुलाखत पत्रे त्यांचे रजिष्टर ई-मेल आय.डी.वर पाठविण्यात येतील.

२३) अर्ज करतांना उमेदवाराने दिलेला ई-मेल आयडी वर मुलाखत पत्रे तसेच निवड आदेश पाठविण्यात येणार असल्याने सदर ई-मेल आयडी चेक करत राहणेची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

२४) उमेदवारास ई-मेल द्वारे कळविण्यात आलेली प्रत्यक्ष मुलाखतीची तारीख,वेळ यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.दिलेल्या तारीख व वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहणेचे बंधन उमेदवारावर राहील.

२५) प्रत्यक्ष मुलाखती करीता उपस्थित राहणेसाठी कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

२६) प्रत्यक्ष मुलाखती साठी येतांना उमेदवाराने शैक्षणीक पात्रते संबंधी सर्व मुळ कागदपत्र तसेच ओरीजनल आधार कार्ड/पॅन कार्ड जवळ ठेवणे आवश्यक आहे.

२७) शिकाऊ उमेदवाराची संख्या वाढविणे/कमी करणे तसेच इतर अटी व नियमा बाबत फेरबदल करण्याचा अधिकार बँकेस राहील किंवा सदर प्रक्रिया कुठल्याही स्तरावर रद्द करण्याचे अधिकार बँकेस राहतील.

२८) ऑन लाईन अर्ज करणेकरीता
लिंक ओपन दि.२०.६.२०२३
अर्ज करणेची तारीख.२०.६.२०२३
अर्ज करणेची शेवटची तारीख ५.७.२०२३ रात्री १२ वाजे पर्यंत
प्रत्यक्ष मुलाखत माहे जुलै २०२३ किंवा ऑगस्ट २०२३ मध्ये
वरील तारखांमध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेस राहील.

EPP/41

मुख्य कार्यकारी अधिकारी